तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक ११६९, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : director@dte.org.in Website: http://www.dte.org.in

**परिपत्रक**

क्रमांक: १/डिटीई/२०१०/ ७७८३
दिनांक:- - 9 SEP 2010

प्रति,

सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद.

विषय:- विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत.

आपल्या विभागात येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांमध्ये (तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, व्यवस्थापनशास्त्र) खालील सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत संस्थांना कळवावे व त्याचा आढावा आपण वेळोवेळी घेऊन या कार्यालयास सादर करावा.

- ग्रंथालयाची सुविधा सकाळी ८ ते रात्री १० या वेळात उपलब्ध करुन द्यावी. परीक्षेच्या कालावधीत वरील सेवा विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार जास्त कालावधीपर्यंत उपलब्ध करुन द्यावेत.
- आपल्या महाविद्यालयातील वसतीगृहात रहाणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.
- सुट्टीच्या कालावधीत इतर महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी इंडस्ट्रिअल ट्रेनिंगसाठी, आपल्या महाविद्यालयातील वसतीगृहामध्ये रहाण्याची विनंती करीत असतील तर त्यांना शासकीय नियमानुसार सुविधा उपलब्ध करुन द्यावी.
- आपल्या महाविद्यालयामध्ये इंटरनेट, सुसज्य प्रयोगशाळा विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार कार्यालयीन वेळेनंतर देखील प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात.

- आपल्या महाविद्यालयामध्ये टिचिंग लर्निंग प्रोसेसमध्ये केवळ शिक्षकांवर अवलंबून न रहाता काही प्रमाणात माजी विद्यार्थी व उद्योगक्षेत्रातील मान्यवरांचा समावेश करण्यात यावा.
- विद्यार्थी तसेच अध्यापक यांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच त्यांनी केलेल्या उल्लेखनिय कामांची नोंद घेण्यासाठी संस्थास्तरावर कार्यवाही करण्यासाठी उचित मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात यावी.
- आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना त्यांचे प्रोजेक्ट वर्क हे उद्योगधंद्यातील प्रश्न व समाजातील अडचणीवर आधारीत असावे.
- विद्यार्थी, अध्यापक तसेच इतर शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामध्ये सामाजिक प्रश्नांबददल जागृती, संवेदना निर्माण करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील काही प्रश्न व त्यावरील उपाययोजना यासाठी संस्थास्तरावर मार्गदर्शक तत्वे निर्धारित करण्यात यावी.
- आपल्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थी व अध्यापक यांचेशी विद्यार्थ्यांचा सुसंवाद प्रस्तावित करण्यासाठी व त्याचा शैक्षणिक लाभ घेण्यासाठी मेंटर (Mentor) पध्दत संस्थास्तरावर राबविण्यात यावी.
- आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षकांना रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट क्षेत्राचे महत्व पटवून देऊन सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.

(डॉ. एस. के. महाजन)
प्र. संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

*****************************************************************************

जा.क्र. तंशि/विकाना/तांशा/२०१०/ 166
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
दिनांक 13 SEP 2010

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / एचएमसीटी / एमबीए / एमसीए ,
पदविका पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
नाशिक विभाग

२/- त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे सदर पत्रातील सूचनेप्रमाणे नोंद घेउन त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.

(दि.रा.नंदनवार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत - प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक
२/- सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.